# संत एकनाथ



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय ना-वा
दा. क. ३५८

BVBK-0400357

॥ श्री ॥

परीकथा
आधारित

# संत एकनाथ
## आणि
## इतर कथा

BVBK-0400357

लेखक
गोपाळ नीळकंठ दांडेकर

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
...एक रुपया...नाग.
क्र. क्र. ३५५ विभाग .......
दिनांक ... क्र. ..........

ग्रंथ प्रकाशक व ग्रंथ विक्रेते
श्रीराम प्रकाशन
२१६, शनिवार पेठ, पुणे ३०.

**प्रत्येकी ऐंशी पैसे**

| | | |
|---|---|---|
| जादूचा राजहंस | जादूची पुतळी | जादूचे जोडे |
| तीन जादूगार | जलराक्षस | जादूचा झुंबर |
| जादूचा गालिचा | जादूचा किल्ला | पाच पांडव |
| चंद्रसेन आणि उडता घोडा | राजा दक्ष | संत एकनाथ |
| संत ज्ञानेश्वर | चीन देशाची राजकन्या | यज्ञकन्या द्रौपदी |
| छत्रपती शिवाजी महाराज | संत तुलसीदास | नवनाथांच्या गोष्टी |
| काळा राक्षस | श्रीरामचंद्र | धनुर्धारी अर्जुन |
| जादूचा पिसारा | जादूचे विमान | लवकुश |
| हिमगौरी | जादूचा वेल | जादूचा अंजीर |

**प्रत्येकी एक रुपया**

| | | |
|---|---|---|
| जादूचे जहाज | जादूची आंगठी | जादूगार फकीर |
| दोन राजपुत्र | जादूची तलवार | जादूचा भोपळा |
| तीन राजपुत्र | राक्षसाची पेटी | जादूचा राजवाडा |
| काळा जादूगार | इसापनीति–१ | लाल चोर |
| जादूचा मासा | जादूचा करंडा | जादूचे पान |
| एक राक्षस | दोन राक्षस | गोपालकृष्ण |
| धाडसी राजपुत्र | बुटका जादूगार | अलीबाबा आणि |
| सात राजपुत्र | लबाड जादूगार | चाळीस चोर |
| जादूचा आरसा | सोनेरी केसांचा राक्षस | जादूची पेटी |
| सात राक्षस | राक्षसांचा राजा | जादूचे कबूतर |
| जादूचे सरोवर | | |

सर्वाधिकार प्रकाशकाधीन.

मुद्रक :
सौ. आशा प्र. बापट
स्मिता मुद्रणालय,
१२९८, शुक्रवार पेठ, पुणे २.

प्रकाशक :
सौ. शैलजा म. भावे
श्रीराम प्रकाशन,
२१६, शनिवार पेठ, पुणे ३०.

शके १८९९
ऑगस्ट १९७७.

# संत एकनाथ

## पणजोबा

ऐका, चिमण्या मित्रांनो, एकनाथाची कथा. अगोदर लहानग्या एकनाथाची, नि मग मोठ्या एकनाथाची.

आपल्या या म्हाराष्ट्र-महाराष्ट्र देशात पैठण नावाचं गाव. त्याच्या जवळून गोदामाई वाहते. तिचं भलं मोठं पात्र. भलं थोरलं वाळवंट. पात्रात खूप पाणी. तिच्या काठावरच पैठण गाव.

तिथं खूप मोठमोठाले शास्त्री राहायचे. पंडित राहायचे. स्नानं करायचे. संध्या उरकायचे. मग मोठमोठ्या ग्रंथांचं पठण करायचे. त्यांच्याजवळ किती तरी शिष्य. ते शिष्य गुरूच्या घरी राहायचे. गावात माधुकरी मागायचे. गुरू-जवळ शिकायचे.

पैठणला खूप मोठ्ठाली देवळं. त्या देवळांतून या शास्त्री-पंडितांचे वाद व्हायचे. चर्चा व्हायच्या. त्यांच्याकडे किती तरी भांडणं न्याय मिळण्यासाठी यायची. त्यांचे निवाडे व्हायचे. पैठणला त्या वेळी म्हणत, दक्षिण काशी!

अशा त्या पैठणात एक ब्राह्मण राहायचा. भानुदास त्याचं नाव. खूप चांगला माणूस. दयाळू, खरं बोलणारा, न्यायानं वागणारा. देवाचा मोठा भक्त. दर वर्षी आषाढी एकादशी आली, की पंढरपूरला जायचा.

हाती टाळ. खांद्यावर पताका. कपाळी गंध. मुखानं विठ्ठलनामाचा गजर. असा भानुदास पंढरीला जायचा. पांडुरंगाच्या राउळात जाऊन त्याचा श्रीहरी तो डोळे भरून पाहायचा. म्हणायचा,

' पांडुरंगा ! विठ्ठला ! तू चांगला आहेस ! फार चांगला ! '

त्याच्या डोळ्यांतून घळाघळा आसवं वाहायची. विठ्ठलावर त्याचं भारी प्रेम !

एकदा काय झालं, विजयनगरचा कृष्णदेवराय राजा– तो पंढरीला आला. बरोबर किती तरी सैन्य. मोठा थाटमाट. तो राउळात आला. त्याला विठ्ठलमूर्ती भारी आवडली. त्यानं विचार केला, ही मूर्तीच विजयनगरला घेऊन जाऊ !

राजाच्या मनात आल्यावर मग उशीर कशाचा ! उचलली त्यानं मूर्ती ! नेली विजयनगरला ! सगळे पंढरीचे भक्त राहिले टकमका त्याच्याकडे पाहात ! राउळात देव नाही ! सगळी पंढरी गडबडली.

पुढल्या आषाढीला भानुदास पंढरीला आला. पाहतो तो विठ्ठलमूर्ती नाही ! त्याला सगळा प्रकार कळला. त्यानं प्रतिज्ञा केलीन्–

' माझ्या पंढरीरायाला परत आणीन तरच मी त्याचा भक्त ! '

गेला तो विजयनगरला. राउळात गेला. तिथला थाटमाट पाहिलान्. मग तो पंढरीनाथाला म्हणाला,

' विठुराया ! इथल्या थाटामाटाला भुललास ना ? आम्हा गरीब भक्तांना विसरलास ना ?

त्यानं विठ्ठलाच्या चरणी भाळ टेकलंन्. विठ्ठलाच्या गळ्यातल्या तुळशीमाळा त्याच्या गळ्यात पडल्या. त्याला खूप आनंद झाला. तो म्हणाला,


'नाही–नाही ! तुला परत यायचंय. तू येतो म्हणाला आहेस !'

तो देवळाबाहेर पडून राजाकडे निघाला. इकडे पुजारी पूजा करायला राउळात आले. पाहतात तो देवाच्या गळ्यातला रत्नहार नाही !

राजाकडे वर्दी गेली. चहूकडे धावाधाव झाली ! भानुदास राजवाड्यात फिरत होता. लोकांनी पाहिलं, त्याच्या गळ्यात रत्नहार आहे ! तुळशीमाळांच्या बरोबर रत्नहार आला होता त्याच्या गळ्यात !

राजानं संतापून आज्ञा दिली,

'त्या चोरट्याला सुळावर चढवा !'



भानुदासाला सुळाकडे चालवलं! तो हसायला लागला बोलला, 'बरी मजा चालवली आहेस हो विठुराया!'

भानुदासाला घेऊन मंडळी पोचली सुळाजवळ. चांगला नोकदार सूळ. पुरुषभर उंच. लोखंडाचा. भानुदासानं विठ्ठलाला नमस्कार केला नि तो म्हणाला,

'पांडुरंगा! तुझी इच्छा!'

तो काय गंमत! त्या लोखंडाच्या सुळाला फुटली की पानं! फुलं! फळं! सेवकांनी राजाला धावत जाऊन हे सांगितलं. राजा भानुदासाकडे लगबगीनं आला. त्यानं भानुदासाच्या पायांवर डोकं टेकलंन्. त्याची क्षमा मागितलीन. म्हणाला,

'क्षमा करा, असं तरी कोणत्या तोंडानं म्हणू?'

'क्षमा कसली करायची, राजा! माझ्या विठुरायाला न्यायला तुझ्या घरी आलो आहे मी.'

'घेऊन जा!'

मग भानुदासानं पुन्हा विठ्ठलमूर्ती पंढरीला आणली! पुन्हा पंढरी विठ्ठलनामाच्या गजरानं दुमदुमली! असा भानुदास! तो आपल्या एकनाथांचा पणजोबा!

## चिमणा भक्त

भानुदासाचा मुलगा चक्रपाणी. चक्रपाणीचा सूर्यनारायण. सूर्यनारायणाच्या बायकोचं नाव रुक्मिणी. त्यांचा मुलगा एकनाथ. दोघंही स्वभावानं फार चांगली. पण एकनाथाला काही लाभली नाहीत!

हे लहानसं लेकरू जन्मलं शके १४५५ मध्ये. अन् लगेच वडील देवाघरी गेले. काही दिवसांनी आईही गेली

बिचाऱ्याची ! आता त्याला कोण ? बाळाला दूध कुणी पाजायचं ? न्हाऊमाखू कुणी घालायचं ? दुपट्यात गुंडाळून पाळण्यात कुणी ठेवायचं ? झोके कुणी द्यायचे ? गाणी कुणी म्हणायची ?

हे सगळं आजीनं केलं. ती त्याची आई झाली. ती त्याची दाई झाली. आजोबांनी अन् आजीनं, दोघांनी मिळून एकनाथाला मोठं केलं.

चार वर्षांचा एकनाथ. एवढासा. चिमणे दात. चिमणे पाय. कमरेला चांदीचा करगोटा. गोजिरवाणा.

पण त्याला छंद कशाचा ? त्याला छंद देवपूजेचा. त्याला छंद भजनाचा. आजोबांनी त्याला इवले इवले झांज आणून दिले. लहानशी पताका करून दिली. मग एकनाथ गंधाचा टिळा लावायचा. खांद्यावर पताका टाकायचा. अन् चालायचा भजनाचा धुमाकूळ !

ज्ञानदेव मुक्ताबाई । छंद लागो तुझ्या पायी ।।

बारकी बारकी पोरं गोळा करावीत. एकनाथानं त्यांच्या हाती द्यावेत दगडांचे टाळ. आपण आजोबांचं पागोटं घालावं डोक्यावर. उपरणं बांधावं कमरेला. अन् त्या चिमण्या भक्तमंडळींच्या मध्ये उभं राहून सुरू करावं कीर्तन !

' बरं का बापहो ! आपला पांडुरंग फार चांगला आहे बरं ! विटेवरी पाय, कटेवरी हात। काय मौजेचा पंढरीनाथ ! '

अन् जेव्हा ती सगळी पोरं दगडाचे टाळ, ताटल्या, फुलपात्रं, वाट्या ही वाद्यं वाजवून भजनाचा गदारोळ करायची,

तेव्हा आजोबांना अन् आजीला अगदी धन्य धन्य व्हायचं !

## अध्ययन ★

सहाव्या वर्षी एकनाथाची झाली मुंज. होम झाला. हवन झालं. गायत्री मंत्राचा उपदेश केला गुरुजींनी. एकनाथ लागला त्यांच्या घरी शिकायला जायला. गुरुजींनी शिकवावं अन् एकोबानं पाठ करावं ! भराभर शिकायला लागला आपला एकनाथ !

संध्या, वैश्वदेव, त्रिसुपर्ण, धातुरूपावली, शब्दरूपावली, अमरकोश, सगळं सगळं गुरुजींनी पढविलं, एकनाथानं उचललं. पण एकनाथाच्या मनात शंका येत–

'माणूस जन्माला येतो कुठून ? मेल्यावर जातो कुठे ? म्हणे देव जन्माला घालतो. पण तो देव कुठे राहतो ? काय करतो ? काय जेवतो ? कुठे झोपतो ?

'चांगला दयाळू आहे म्हणे तो देव. मग माझ्यावर का दया करीत नाही ? मला का भेटत नाही ? मीही तर त्याचा भक्त आहे. मीही भजन करतो. कुणाला उगीचच्या उगीच मारीत नाही. कुणाला फसवीत नाही. कुणाला दुखवीत नाही. खोटं बोलत नाही. आजोबा अन् आजीला नमस्कार करतो. अगदी रोज.

'मग देव मला का भेटायला येत नाही ? की त्याच्याकडे जायला हवं ? तो देवळात आहे म्हणतात. मी तर रोज जातो देवळात. पण देवळातली मूर्ती एकदाही मला तर बोलावीत नाही ! 'एकोबा ! बरं आहे ना ?' असं विचारीत नाही !

'केव्हा भेटेल मला देव ?'

एकनाथ हे सगळं गुरुजींना विचारी. ते तोंडात बोट घालीत. म्हणत, 'मलाही यातलं काही माहीत नाही. एकोबा ! तुला हे कसं सुचलं ?'

एकोबा म्हणे,

'मलाही नाही ठाऊक. पण मला असं वाटतं खरं !'

एकोबाच्या प्रश्नाचं उत्तर कोणीचं दिलं नाही ! सगळ्या पैठणात कोणीही नाही !

★

## जनार्दनाचा एका

एकोबानं ठरवलंन्– सद्‌गुरूचा शोध घ्यायचा. त्यांच्याकडे जायचं. त्यांच्या पायांवर डोकं टेकायचं. त्यांना म्हणायचं,

'मी तुमचं काय वाटेल ते काम करीन ! धुणी धुवीन ! अगदी उष्टीसुद्धा काढीन ! पण तुम्ही माझी अन् देवाची भेट करवून द्या !'

रात्री अन् दिवसा एकोबा त्या काळजीत !

अचानक त्याला वाट दिसली ! एका पांथस्थ ब्राह्मणानं एकोबाला सांगितलंन्,

'एकनाथा तू देवगिरीला जा ! तिथं जनार्दनस्वामी आहेत. मोठे अधिकारी पुरुष ! ते करवतील तुझी अन् देवाची भेट !'

ठरवलंन एकनाथानं– देवगिरीला जायचं ! पण कसं जायचं ? आजोबा अन् आजी कशी जाऊ देतील ! एकोबा तर अजून बाराच वर्षांचा आहे !

तर मग हळूच पळून जायचं !

एका रात्री एकोबा आपल्या अंथरुणावर झोपला. शेजारी आजी. पलीकडे आजोबा. पहाटेस एकनाथ जागा



झाला. हळूच उठला तो. एवढासाही आवाज न करता. गुपचूप त्यानं आजा-आजीला नमस्कार केलान्. मनातल्या मनात म्हणाला,

'आजोबा, आजी, रागावू नका बरं का ! मी देवाचा तपास करायला जातोय! काही वाईट कामाला जात नाही!'

अन् हळूच एकोबा घराबाहेर पडला. तडक देवगिरीची वाट चालू लागला तो. देवगिरी पैठणहून चाळीसपन्नास मैल. तेव्हा काही आतासारख्या मोटारी नव्हत्या. सडकासुद्धा नव्हत्या. अशी लांबच्या लांब देवगिरी.

एकोबा चालतोय. धुळीतून चालतोय. उन्हातून

चालतोय. डोंगरातून चालतोय. माळावरून चालतोय. घामाच्या धारा. जीव थकून गेला तरी एकोबा चालतोच आहे !

थकलेला, गळलेला, कोमेजलेला एकोबा देवगिरीला पोचला. देवगिरी हा किल्ला. भला मजबूत. किती तरी पहारेकरी. ते म्हणाले,

‘ ठहरो ! ’

एकनाथ थांबला. तोंडावरून हात फिरवून तो म्हणाला,

‘ अहो, मला जनार्दनस्वामींना भेटायचंय ! ’

पहारेकरी हसले. ते म्हणाले,

‘ जाव अंदर ! ’

एकनाथाला आनंद झाला ! आता मला माझे जनार्दन-स्वामी भेटणार ! माझे सद्‌गुरू भेटणार ! किती मजा ! किती आनंद ! तो आत चालला. एक वाड्याजवळ पोचला. त्या वाड्यात एक कुणी तरी मोठे अधिकारी बसले होते, ते एका खटल्याचा निकाल देत होते. समोर उभे होते फिर्यादी अन् आरोपी. दोन्ही बाजूंना उभे होते पुष्कळ सैनिक.

अधिकाऱ्यांनी एकनाथाला पाहिलं. ते म्हणाले,

‘ त्याला काय पाहिजे ? ’

एकनाथ मोठ्यानं म्हणाला,

‘ मला जनार्दनस्वामी पाहिजेत ! ’

‘ कशाला ! ’

‘ मला त्यांच्याजवळून उपदेश घ्यायचाय ! देव कसा भेटेल ते विचारायचंय त्यांना ! ’

अधिकारी गालातल्या गालात हसले. ते म्हणाले,

‘ ये मुला. बैस इथं. थोड्या वेळानं भेटतील जनार्दनस्वामी !’

एकनाथ जाऊन आंथरीवर बसला. खटला संपला. माणसं घरोघर गेली. अधिकारी उठून वाड्यात गेले. एकनाथ एकटाच्च बसून राहिला. मनात म्हणतोय,

‘ कसे असतील जनार्दनस्वामी ? मला उपदेश देतील का ते ? माझी सेवा घेतील का ?’

थोड्या वेळानं एक पहारेकरी आला अन् म्हणाला,

‘ ए छोकरे ! तुझे स्वामी बुलाते हैं !’

एकनाथ त्या माणसामागं चालला. पहारेकऱ्यानं त्याला एका खोलीत जायला सांगितलं. एकनाथ आत शिरला. त्यानं पाहिलं, आत छानदार देवघर आहे. त्यात दत्ताची गोजिरवाणी मूर्ती आहे. त्या देवघरासमोर एक आसन मांडलंय. अन् त्या आसनावर सोवळं नेसून अन् शाल पांघरून बसले आहेत मघाचे अधिकारी !

‘ ये बाळ !’

एकनाथाला भारी आश्चर्य वाटलं ! तो हळूच म्हणाला,

‘ काय ! तुम्हीच जनार्दनस्वामी !’

‘ होय बाळ ! जनार्दनस्वामी मलाच्च म्हणतात !’

एकनाथानं त्यांच्याकडे धाव घेतली ! त्यांच्या पायावर डोकं ठेवलं ! त्यांना तो म्हणाला,

‘ सद्गुरुराया ! मला देव भेटवा !’

‘ थांब बाळ ! कुठून आलास तू ?’

‘ पैठणहून !’

‘ एकटाच्च आलास का ?’

'हो !'

'किती दिवस झाले पैठण सोडून ?'

'झाले चारपाच दिवस.'

'या चारपाच दिवसांत जेवलास किती वेळा ?'

'जेवलो असेन दोनतीनदा ! पण मला देव भेटवाल ना ?'

जनार्दस्वामींच्या डोळ्यांत आसवं उभी राहिली. त्यांनी एकनाथाला घट्ट मिठी मारली. ते म्हणाले,

'भेटेल बरं बाळ तुला देव ! खाण्यापिण्याची पर्वा न करता तू देवाचा ध्यास घेऊन मला शोधीत आलास ! जरूर भेटेल देव तुला ! राहा तू इथं.'

एकनाथ तिथं राहिला !

त्यानं जनार्दनस्वामींची सेवा करावी. पहाटे त्यांच्या अगोदर उठावं. स्नान करावं. गुरुदेव उठले की त्यांचं अंथरूण गोळा करावं. त्यांना स्नानासाठी पाणी द्यावं. त्यांच्या संध्येची तयारी करावी. गंध उगाळावं. धोतराच्या निऱ्या कराव्यात.

स्नानसंध्या झाली की त्यांच्याबरोबर कचेरीत जावं. ते सांगतील तो मजकूर लिहावा. सांगतील त्याच्या नकला कराव्यात.

त्यांच्या मागून जेवावं. दुपारी ते झोपले की त्यांचे पाय चेपावेत. तिसऱ्या प्रहरी त्यांच्याबरोबर दत्तमंदिरात दर्शनाला जावं. रात्री जनार्दनस्वामी त्याला पोथी सांगत. देवाचं चरित्र ऐकवीत. रामायण अन् महाभारत. पुराणं अन् उपनिषदं. ते सगळं त्यानं जिवाभावानं ऐकावं.

पोथी झाली की स्वामींचं अंथरूण घालावं. ते झोपले की पुन्हा त्यांचे पाय चुरावेत. त्यांना छानदार अभंग म्हणून दाखवावेत.

स्वामी म्हणत,

'एकोबा!'

'काय?'

'तू भारी चांगला आहेस!'

स्वामी झोपले की त्यांच्या पायथ्याशी एका घोंगडीवर एकनाथानं झोपावं. त्याची झोप मोठी सावध. एवढासाही आवाज झाला की पटकन तो जागा व्हायचा. रात्रभर जणू आपल्या गुरुदेवांवर पहाराच करतोय एकनाथ!

●

## पैचीं चूक

एकदा स्वामींनी एकनाथाला कसला तरी हिशेब करायला सांगितलं. एकनाथानं हिशेब तर केलान्, पण त्यात एका अडक्याची चूक निघाली! काही केल्या जमेना! एकनाथाला लागली चुटपुट!

रात्र झाली. स्वामी झोपले. एकनाथ हळू पावलांनी शेजारच्या खोलीत गेला. त्यानं दिवली पेटवली अन् पुन्हा वह्या घेऊन बसला!

एकदा हिशेब केला. बेरीज, वजाबाकी, सगळं केलं तरी चूक सापडेना! दोनदा केला. तीनदा, चारदा, पाचदा! शेवटी एकनाथ ठाण मांडून बसला!

कितीही वेळा हिशेब करावा लागो ! मी करीन. पैचीही चूक निघाली, तर गुरुदेव काय म्हणतील मला !

रात्रभर तो त्याच नादांत गुंग ! तो स्वतःला विसरला. जगाला विसरला. सगळं काही विसरला. डोकं खाली घालून हिशेब करतोय ! बे दुणे चार नि तीन साते...

सापडली चूक ! एकनाथाला आनंद झाला ! हर्षानं त्यानं काडदिशी टाळी वाजविली !

स्वामी दाराशी येऊन उभे राहिले होते ! त्यांनी विचारलं,

'नाथा ! कसला रे आनंद झाला ?'

लाजून नाथानं त्यांना सगळी हकीकत सांगितली. जनार्दनस्वामी त्याला मिठी मारून म्हणाले,

'एकनाथा ! एवढ्या तन्मयतेनं तू पैची चूक शोधून काढलीस ! रात्रभर त्यासाठी जागलास ! देव नक्की भेटणार तुला !'

एकनाथानं पटकन त्यांच्या पावलांवर डोकं ठेवलंन्.

## रणशूर एकनाथ

होता होता एकनाथाला सगळं यायला लागलं. जनार्दनस्वामी त्या प्रांताचे अधिकारी. त्यांच्या घरी छानदार घोडे, सगळी शस्त्रास्त्रं. तलवारी, भाले, कट्यारी, बंदुका, पेशकब्ज, जंबिये, विटे, पिस्तुलं सगळं काही. जनार्दनस्वामींना कधी कधी युद्धावर जावं लागायचं. कुठं चोरलुटारूंनी बंड केलं तर स्वतः हत्यारं घेऊन ते मोडावं लागायचं.

एकदा स्वामी ध्यानस्थ बसले. आता दोन प्रहर काही उठायचे नाहीत! अन् अशा वेळी एक सैनिक धावत धावत आला अन् सोळा वर्षांच्या एकनाथाला म्हणाला,

'एकनाथजी! स्वामी कहाँ हैं?'

'का रे बाबा? ध्यानाला बसले आहेत!'

'अरे! घोटाळा झाला.'

'का रे?'

'दरोडेखोर आले आहेत! स्वतः स्वामींनाच जायला हवं होतं!'

'बरं! येतील ते! सैन्य तयार कर!'

थोड्या वेळात वाड्यातून अंगावर चिलखत, शस्त्रं अन् तोंडावर जाळी ल्यालेला एक स्वार घोड्यावर बसून बाहेर पडला! सैनिकांना वाटलं, जनार्दनस्वामीच आहेत. कारण तो घोडा, ती शस्त्रं, ते चिलखत जनार्दनस्वामींचं होतं!

आवेशानं ते सैन्य दरोडेखोरांवर तुटून पडलं. त्या स्वारानं दो दो हातांनी तरवार गाजवली! पार पिट्ट पाडला दरोडेखोरांचा! सगळे सैनिक आनंदाने ओरडायला लागले,

'जनार्दनस्वामी की जय!'

तो स्वार कुणाला पत्ता न लागू देता परत फिरला. वाड्यात आल्यावर त्यानं सगळी शस्त्रं नीट ठेवून दिली. चिलखत उतरलं अन् जसं काही झालंच नाही काही अशा थाटात आपल्या कामाला लागला!

जनार्दनस्वामी ध्यानातून उठले. लोक येऊन त्यांना मुजरा करून म्हणाले,

'सुभेसाहेब ! आज आपण होतेत म्हणून दरोडेखोर ठार झाले ! काय तरवार चालवलीत आज आपण !'

स्वामींना काही कळेना ! त्यांनी गोंधळून एकनाथाकडे पाहिलं. त्यानं मान खाली घातली ! स्वामींनी ओळखलं. ते हसून म्हणाले,

'कोण लढणार ? कोण लढविणार ? सगळं काही तो 'एक' जगाचा 'नाथ' करतो ! '

मंडळी गेल्यावर एकनाथाची पाठ ठोकीत ते म्हणाले, 'नाथा ! कसं केलंस हे ?'

'स्वामी ! आपलं नाव घेतलं, अन् लढलो झालं ! पुढचं काही माहीत नाही !'

'भले शाबास ! एकनाथा, आता तुला समजायला लागलं ! देवाचं नाव घेऊन, अहंकार सोडून कर्म कसं करायचं ते तुला उमगलं आता ! देव तुला नक्की भेटणार !'

●

## दत्तदर्शन

एकदा सकाळी स्वामी एकनाथाला म्हणाले,

'एकनाथा ! किल्ल्यातल्या झाडीत एक औदुंबराचं झाड आहे. त्याच्याखाली दत्तांच्या पादुका आहेत. आज आपण तिथं जायचं !'

दोघे तिकडे निघाले. झाडीत शिरल्यावर थोड्या वेळानं

औदुंबराचं झाड दिसलं नाथाला. तिथं दत्तांच्या पादुका होत्या, त्याच्यावर दोघांनीही डोक टेकलं. एवढ्यात तिथं एक साधू आला ! बरोबर दोन-चार कुत्र्या ! काखेत झोळी ! हातात भिक्षापात्र !

तो येताच जनार्दनस्वामी कडकडून भेटले त्याला ! दोघे जवळ जवळ बसले, अन् कोण जाणे, कोणत्या भाषेत बोलायला लागले ते ! एकनाथ दूर बसून राहिला. त्याला वाटलं की, हा साधू काही साधासुधा नाही !

थोड्या वेळानं त्या साधूनं आपल्या भिक्षापात्रात कुत्रीचं दूध काढलं. झोळीतील भाकरी काढून त्यात कुस्करली. स्वामी अन् तो, दोघे मिळून पोटभर जेवले. एकाच पात्रात !

जनार्दनस्वामी म्हणाले,

' एकनाथा ! बाळ, एवढं हे भांडं विसळून आण रे ! '

एकनाथानं ओळखलं, हा साधू नव्हे ! दत्त आहेत हे ! त्यानं ते पात्र घेतलंन्, विसळलंन्, अन् प्रसाद म्हणून ते पाणी पिऊन टाकलंन् !

स्वामी हे सगळ पाहात होते. त्यांनी साधूला म्हटलं,

' महाराज ! का अंत पाहता आता ? सत्पात्र आहे ! द्या दर्शन ! '

साधू दिसेनासा झाला ! दत्त प्रकट झाले ! तीन शिरे ! सहा हात ! काखेत झोळी ! पुढे श्वान ! पायी खडावा ! दयेनं भरलेली दिठी !

एकनाथ धावत आला. त्यानं पायी मिठी मारली! दत्तांनी उचलून त्याला आलिंगन दिलं, अन् म्हणाले,

'बाळ! मोठा होशील! लोकांना भक्तिमार्गाला लावशील!'

●

## तपश्चर्या

त्यानंतर स्वामींनी एकनाथाला त्याच जागी तपश्चर्येला बसवलं. आता सद्गुरूंची सेवा बंद. ध्यान धरायचं. धारणा करायची. आसन मांडायचं. मुद्रा लावायची.

एकनाथ तपश्चर्येनं उजळू लागला. रोज सूर्य उगवायचा अन् मावळायचा. पण सकाळी ध्यानाला बसलेला एकनाथ काही अंधार पडल्याशिवाय उठायचा नाही!

गडावरला एक गुराखी रोज तिथं गुरं घेऊन यायचा. तो एकनाथाला पाहायचा. त्याला मोठं बरं वाटायचं. तो रोज नाथाला दुरूनच साष्टांग नमस्कार करायचा. त्याच्या-करिता दुधाच्या तांब्या आणायचा तो.

एके दिवशी एकनाथ ध्यानाला बसला. त्याच्या मागच्या ढोलीतून एक भला थोरला नाग बाहेर पडला! काळा-कुळकुळीत! दहाचा आकडा! तो नाथांच्या मांडीजवळ आला! खांद्यावर चढला! अन् मानेभोवती विळखा घालून डोक्यावर फणा धरून बसला! नाथाला काही त्याचं भान नाही! चार-सहा दिवस हा प्रकार चालला!

सातव्या दिवशी गुराखी आला, अन् पाहतो तो

नाथाच्या डोक्यावर नागाची फणा ! नाग जिभा बाहेर काढून वेळावतो आहे !



गुराखी भीतीनं काळा पडला ! मोठ्यानं ओरडला तो, ' माझ्या नाथाला खाल्लं नागानं !'

नाथ भानावर आला. त्यानं त्या नागाला पाहिलं. तो नाग अलगद खाली उतरला. नाथासमोर वेटोळं घालून बसून राहिला ! नाथ कौतुकानं म्हणाला,

' ये गड्या ! दूध पी ! भूक लागली आहे तुला !'

दूध पिऊन नाग बिळात निघून गेला ! नाथाला मोठं समाधान झालं ! आता कुणाचं भय उरलं नाही !

आम्हा डंखूं आला काळ। तंव तो काळ झाला कृपाळ ।।

## तीर्थयात्रा

३५८

तपश्चर्या संपली. स्वामी म्हणाले,

'नाथा ! आता तीर्थयात्रेला निघायचं !'

नाथाच्या डोळ्यांत आसवं आली. आता गुरुदेवांना सोडून जावं लागणार ! त्यानं स्वामींच्या चरणी मिठी मारली अन् म्हणाला,

'स्वामी ! आपल्याला सोडून कसा राहू ?'

'वेडा रे वेडा ! अरे, आपण सगळी देवाची रूपं ! मी सगळीकडे आहे. तू सगळीकडे आहेस ! माहीत आहे ना तुला हे ?'

'होय स्वामी !'

'तर मग रडायचं नाही. ऊठ ! नाशिकपर्यंत मी तुझ्याबरोबर येतो.'

दोघे गुरुशिष्य निघाले. वाटेनं निरनिराळ्या तीर्थांची दर्शनं घेत चालले ते. गुरुंच्याबरोबर चालावं, चर्चा करावी, ते सांगतील तो परमार्थ ऐकावा ! नाथाची मोठी मजा !

ते दोघे नाशकास पोहोचले. गोदामाईत आंघोळी केल्या त्यांनी. रामरायाचं दर्शन घेतलं. राम–सीता राहिली त्या गोदाकाठी ते बसले. तिथली धूळ त्यांनी कपाळी लावली. मग ते दोघे एका राऊळात राहिले. जनार्दनस्वामी म्हणाले,

'एकनाथा ! आता तू एक काम करायचंस ! भागवत ग्रंथ फार गोड ! पण तो संस्कृतात आहे. भोळ्या भाविकांना कळत नाही. तेवढा मराठीत आणायचास !'

नाथ आसन लावून बसले. समोर गुरू बसले आहेत, नाशिकची विद्वान मंडळी आहेत; त्या सगळ्यांसमोर त्यांनी चतुःश्लोकी भागवत सांगितलं! ओवीरूपानं! रसाळ, सोपी भाषा! उदाहरणांनी नटलेली! नाशिककरांनी माना डोलावल्या; स्वामींनी शाबासकी दिली अन् म्हटले,

'भले नाथा! आता जन्मभर हेच करायचे! लोक चांगल्या वाटेला लावायचे! अगोदर सगळा देश पाहून ये! अन् मग पैठणला राहून हेच काम कर! तू खूप मोठा होशील! माझा तुला आशीर्वाद आहे!'

नाथांनी स्वामींच्या पायी डोई ठेवली अन् ते चारी-धामांच्या तीर्थयात्रेला निघाले!

★

## परत पैठणला

बारा वर्षांचा चिमणा एकनाथ घर सोडून निघून गेला! आजा-आजींवर जणू आकाशीची कुऱ्हाड कोसळली! रडून रडून त्यांचे डोळे सुजले. दृष्टी मंद झाली. त्यांनी एकनाथाच्या शोधासाठी सगळी पंचक्रोशी पालथी घातली. अगदी तसून् तसू. पण तो काही सापडला नाही!

दोघंही मोठ्या दुःखात आला दिवस कसा तरी पार पाडू लागली. शेवटी एक दिवस एक पुराणिकबुवा पैठणला आले. थकलेले चक्रपाणी आजोबा देवळात दर्शनाला गेले. त्यांना

पुराणिकबुवा देशोदेशींच्या गोष्टी बोलताना आढळले. आजोबांनी त्यांना एकनाथाच्या खाणाखुणा सांगितल्या अन् म्हटलं,

‘ असा आमचा एकनाथ तुम्ही पाहिला का हो कुठं ?’ पुराणिकबुवा चमकले. ते म्हणाले,

‘ हो ! देवगिरीला पाहिला !

मग चक्रपाणींनी त्यांना घरी नेलं, अन् सगळी हकीकत सांगून गळ घातली,

‘ देवा ! कसंही करा ! आमच्या वंशाच्या दिव्याची अन् आमची भेट करवा ! ’

पुराणिक भला माणूस. तो तातडीनं देवगिरीला गेला. अन् टाकोटाक परतला. त्यानं जनार्दनस्वामींकडून आज्ञापत्र आणलं होतं. त्यात लिहिलं होतं,

‘ तीर्थयात्रा संपल्यावर गृहस्थाश्रम स्वीकारावा ! आजा-आजीस संतोषवावे ! जगाचा उद्धार करावा ! ’

ते पत्र आजोबांनी घेतलं. उरीशिरी धरलं, अन् ते एकनाथांची वाट पाहात राहिले.

वर्षं लोटली. एके दिवशी एक माणूस धावत धावत आला, अन् आजोबांना म्हणाला,

‘ आजोबा ! चला तर ! तुमचा एकनाथ आला आहे ! ’

खरोखरी एकनाथ आला होता ! पिंपळेश्वराच्या रावळात उतरला होता तो. प्रसन्न, तरुण एकनाथ !

आजोबा अन् आजी धावत, पडत, झडत देवळात गेली, अन् नाथांना पाहताच मिठी मारून त्यांनी हंबरडा फोडला.

'नाथा ! कुठं गेला होतास रे आम्हाला टाकून ?'

★

## गृहस्थाश्रम

मग नाथ तिथंच राहिले. त्यांनी श्रीगुरूंचं पत्र वाचलं. ते मस्तकी धरलं. त्यांनी तिथं एक झोपडी बांधली. घरी काही येईनात ते. आजा-आजीला वाटलं,

'न का येईना घरी ! आमचं लेकरू आम्हाला मिळालं, हे काय थोडं झालं ?'

नाथ रोज संध्याकाळी प्रवचन करायचे. गीतेवर प्रवचन. रामायणावर प्रवचन. भागवतावर प्रवचन. मोठी गोड रसाळ भाषा. जणू अमृताचे कल्लोळ ! खूप लोक जमायचे प्रवचनं ऐकायला.

नाथांची ही कीर्ती ऐकली, अन् शेजारच्या गावच्या एका सत्पात्र ब्राह्मणानं आपली लक्ष्मीसारखी साजरी गोजरी मुलगी त्यांना दिली. लग्नसमारंभ मोठ्या थाटाचा झाला. आजोबांनी त्या स्नेहळ नातसुनेचं नाव ठेवलं गिरिजा !

गिरिजा फार चांगली मुलगी. मोठी आज्ञाधारक. उणंदुणं बोलायची नाही. रात्रंदिवस आजाआजींची, पतिदेवांची, आल्या-गेल्यांची सेवा-चाकरी करण्यात धन्य मानायची !

नाथांच्या भक्तांनी झोपडीच्या जागी एक भला मोठा वाडा बांधला. नाथांचा प्रपंच अन् परमार्थ, दोन्ही व्यवस्थित चालायला लागले. नाथांच्या प्रवचनांना खूप गर्दी व्हायला लागली. सगळं पैठण नाथांच्या अमृतवाणीनं न्हाऊन निघायला लागलं.

पण हेच नेमकं काही लोकांना सहन होईना !

## एकशे आठ गंगास्नानं

एकदा सकाळी नाथ गोदामाईचं स्नान करून परतले. वाटेत होती एक धर्मशाळा. त्या धर्मशाळेत एक घाणेरडा यवन राहात होता. नाथांना पाहून तो पचकन त्यांच्या अंगावर थुंकला !

मुकाट्याने नाथ परत फिरले ! ते पुन्हा स्नान करून आले ! यवन पुन्हा थुंकला ! नाथ पुन्हा स्नान करून आले ! पुन्हा थुंकणं, पुन्हा स्नान ! पुन्हा थुंकणं, पुन्हा स्नान ! असं एकशे आठ वेळा घडलं ! एकशे नवव्या वेळी जेव्हा नाथ स्नान करून परतले अन् धर्मशाळेसमोर थुंकण्याची वाट पाहात उभे राहिले, तेव्हा एकदम त्या यवनाला रडू कोसळलं ! तो थडाथडा थोबाडीत मारून घेऊ लागला. म्हणाला,

'एकनाथ मुरशद है ! मौला है ! मैं गुनहगार हूं !'

नाथ त्याचा हात धरून म्हणाले,

'का बाबा रडतो आहेस ? तू होतास म्हणून आज मला एकशे आठ वेळा गंगास्नान घडलं !'

सगळे लोक आश्चर्यचकित झाले !

## कुचर ओटा

गावात एक ओटा होता. त्याचं नाव कुचर ओटा. तिथं गावातले टवाळ बसत. याची निंदा करीत, त्याची निंदा करीत. एकदा तिथं एक पांथस्थ ब्राह्मण आला. दरिद्री बिचारा. मुलांची मुंज करायची होती. जवळ पै नव्हती. त्यानं मंडळींपुढे गाऱ्हाणं मांडलंन्. म्हणाला,

‘कसंही करा ! शे-दोनशे रुपयांची सोय लावा !’

टवाळ म्हणाले,

‘हे बघ ! एकनाथाला राग आणून दाखव ! तुला दोनशेच काय, तीनशे रुपये देतो !’

लोभास बळी पडून ब्राह्मण नाथांच्या वाड्यात शिरला. नाथ देवघरात पूजा करीत होते. सरळ जोडे घालून तिथं जाऊन ब्राह्मण त्यांच्या मांडीवर बसला. त्याला वाटलं, आता नाथ रागवणार !

पण नाथ हसून म्हणाले,

‘वा वा ! किती कौतुकाचा ब्राह्मण ! मला भेटायला किती व्याकुळ झाला ! जोडे काढायचंही भान राहिलं नाही !’

ब्राह्मण पार ओशाळला. तोही हट्टास पेटला. मंडळी जेवायला बसली. गिरिजाबाई वाढायला आल्या. तसा ब्राह्मण आपला ताटावरून टुणदिशी उडी मारून बाईंच्या पाठीवर बसला ! नाथ म्हणाले,

‘सांभाळ हो ! पाडशील ब्राह्मणाला !’

गिरिजाबाई हसत म्हणाल्या,

'नाही पाडायची! मला आहे सवय लहानग्या हरि-पंडिताला पाठीवर घेऊन वाढायची!'

ब्राह्मण नाथांच्या पायांवर कोसळला, अन् सगळी हकीकत सांगून ढसाढसा रडायला लागला. नाथ म्हणाले,

'हात्तिच्या! एवढंच ना? चला तर मग. तुमचे गरिबाचे रुपये तरी कशाला बुडवू मी?'

कुचर ओटयावरून ब्राह्मण पळत सुटला. नाथ त्याच्या मागं जोडा घेऊन शिव्या देत निघाले! ब्राह्मणाचं काम झालं!

★

## पितरांचं श्राद्ध

नाथांचा असा प्रेमभाव पाहिला अन् देवालाही राहवलं नाही! तो त्यांच्या घरा आला. नाव सांगितलंन् श्रीखंड्या. चंदन उगाळायचा, पाण्याच्या कावडी आणायचा, झाडलोट करायचा!

एकदा नाथांच्या घरी श्राद्ध. स्वयंपाक तयार झाला. ब्राह्मण सांगितले. नाथांच्या घरावरून महार मंडळी चालली. फाटके कपडे. उपाशी पोटं. त्यांना अन्नाचा वास आला. ते म्हणाले,

'अहाहा! असलं अन्न आम्हाला कुठून मिळायला?'

नाथांनी ते ऐकलं. लगेच त्यांनी पानं मांडली. त्या महारांना बोलावलं. पोट भरून जेवू घातलं. पुंडलीक वरदा

हरि विठ्ठल गर्जवला ! सगळे महार तृप्त झाले ! डोळ्यांत आसवं आणून त्यांनी आशीर्वाद दिले, अन् घरी गेले.

नाथांनी दुसरा स्वयंपाक केला, अन् ब्राह्मणांना बोलावलं. ते नाथांवर संतापले !

'अगोदर म्हारड्यांना जेवू घालतोस ? पाहू कोण ब्राह्मण येतो तुझ्या घरी तो !'

श्रीखंड्या म्हणाला,

'न का येईनात बापडे ! पानं मांडतो ! प्रत्यक्ष पितर येतील जेवायला !'

पानं मांडली ! भानुदास, चक्रपाणी अन् सूर्यनारायण, तिघेही येऊन जेवून गेले ! ब्राह्मण तोंडात बोटं घालून बसले ! त्यांचेही पितर आले होते जेवायला !

*

## अंत्यजाचं पोर

नाथ गंगेवर आंघोळीस गेले. आंघोळ उरकून हरिपाठ म्हणत परत घरी निघाले ते. तो त्यांना एक लहानगं पोर दिसलं.

मांगाचं पोरं.उघडंनागडं. सगळं अंग धुळीनं भरलेलं. नाक वाहतंय. असं ते पोर आईला हुडकतंय. ओक्साबोक्शी रडतंय ! खाली वाळूत चटाचटा पाय भाजताहेत. पण तसंच इकडे तिकडे धावतंय !

नाथ करुणेनं पाघळले. पटकन त्यांनी ते पोर उचललं. पंच्यानं त्याचं नाक पुसलं. त्याच्या आईला शोधलं. त्याला तिच्या स्वाधीन करून ते बोलले,

'मायबाई ! उन्हाचं पोराला असं वाळवंटात सोडू नये !'

★

## ग्रंथ-लेखन

नाथांनी ग्रंथ लिहिले. तुमच्या-आमच्यासाठी. भोळ्या भाविकांसाठी. किती तरी ग्रंथ. हस्तामलक, स्वात्मबोध, चिरंजीवपद, आनंदलहरी, अनुभवानंद, अभंग, भारुडं, चतुःश्लोकी भागवत, एकादशस्कंध भागवत ! सगळे ग्रंथ सोपे, सरळ, रसाळ.

एकदा नाथांचा एक भक्त काशीला गेला. तिथं नाथ भागवताचा एक अध्याय त्यानं बरोबर नेला. स्नान करून तो अध्याय वाचू लागला. काशीच्या पंडितांनी तो अध्याय ऐकला. मराठीतला अध्याय. ते संतापले. त्या भक्ताजवळ चौकशी करून त्यांनी तातडीनं नाथांना पैठणला बोलावणं धाडलं !

'तुमचं भागवत घेऊन निघून या !'

नाथ काशीला निघाले ! सगळे पंडित खवळले होते. संस्कृतातलं तत्त्वज्ञान मराठीत आणतो ! केवढा अपराध !

नाथ आले. पंडितांना दंडवत घातला त्यांनी. म्हणाले,

‘ काय आज्ञा आहे ?’

‘ तुमचं हे भारुड गंगेत बुडवून टाका !’

‘ देवा ! संस्कृत भाषा देवानं केली. अन् मराठी काय चोरांपासून झाली ? आपण हा ग्रंथ ऐका. चूक वाटला, तर म्हणाल ती शिक्षा मान्य करीन !’



मोठ्या मुष्किलीनं पंडित तयार झाले. मध्ये एक पडदा लावून पलीकडे ते सगळे बसले. नाथांची प्रवचन-गंगा सुरू झाली. गंगामाईच्या बरोबर वाहून तिनं सगळ्या काशीकर पंडितांची मनं धुऊन टाकली !

नाथांना शरण येऊन पंडित म्हणाले,

'नाथा! आपण हा ग्रंथ काशीतच पुरा करा!'

नाथांनी भागवत काशीला संपवलं!

★

## ज्ञानियांचा राजा

परतताना नाथ आळंदीला आले. तिथं सगळं रान माजलं होतं. ज्ञानोबांची समाधी झाडाझुडांत बुजून गेली होती. नाथांना रात्री ज्ञानोबांचा दृष्टांत झाला,

'माझ्या गळ्याला अजानवृक्षाची मुळी लागली आहे; तेवढी काढून टाका!'

सिद्धेश्वराच्या नंदीसमोरची शिळा उचलून नाथ समाधीत शिरले! ज्ञानोबांना उराउरी भेटले! मुळी काढली. ज्ञानोबांनी सांगितलं,

'ज्ञानेश्वरीत अशुद्ध ओव्या घातल्या आहेत लोकांनी; तेवढ्या काढून टाका!'

नाथांनी पैठणला येऊन ज्ञानेश्वरी शुद्ध केली! आपल्यावर डोंगराएवढे उपकार करून ठेवले त्यांनी.

★

## समाधि

सगळं गदळ शांत झालं. प्रपंच फार चांगला झाला. नाथांना तीन मुलं. हरिपंडित, गोदावरी अन् गंगा. परमार्थ तर म्हणावा असा झाला. शरीर थकलं.

शके १५२१ चा फाल्गुन वद्य पक्ष उजाडला. नाथांनी लोकांना सांगितले, ‘ आता आम्ही आमच्या घरी जाणार ! ’

सगळे भक्त गोळा झाले. भजनकीर्तनानं पैठण दुमदुमलं. षष्ठी उजाडली. दुपार व्हायला आली.

नाथ वाळवंटात गेले. तिथं त्यांनी काल्याचं कीर्तन केलं. भक्तीचा पूर लोटला ! आनंद झाला ! लोक कृतार्थ झाले !

अन् मग नाथ गोदावरीत शिरले. पुन्हा दिसले नाहीत ! नाथ त्यांच्या ग्रंथांच्या रूपानं घरोघरी आहेत अजून.

★


…नालय शाखा.
… व ताग.
वा, क्र. ३५५ … दिनांक ……
विषय … का-वा - … ……
BVBK-0400357